2015 – Year of Digitized and Time – Bound Services

# सहायक निबंधक, सहकारी संस्था, डहाणू

## यांचे कार्यालय

रुपाली पार्क इराणी रोड, डहाणू, ता. डहाणू, जि. पालघर ४०१ ६०२

जा.क्र. सनिड/ बी-३/क.७७ (अ)/सुर्या सह.गृह/ ३ /२०१८ दिनांक :- ९/०८/२०१८

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये आदेश**

वाचावे :-१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७ (अ) मधिल तरतूद.
२) सुर्या सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. यांचे पदाधिकारी कडील दिनांक १५/९/१७,
३) संस्थेचे चेअरमन यांचे पत्र दि. १३/३/२०१८

ज्याअर्थी, **सुर्या सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या डहाणू, ता. डहाणू, जि. पालघर** ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ अन्वये नोंदविण्यात आलेली सहकारी संस्था असून ती या कार्यालयाचे अधिकार कक्षेत येते. आणि,

ज्याअर्थी, नोंदणीकृत सहकारी संस्थेचे कामकाज कायदा कलम,नियम व मंजूर उपविधीनुसार चालविणे संस्थेच्या व्यवस्थापक समितीवर बंधनकारक आहे आणि,

ज्याअर्थी, संस्थेचे अध्यक्ष ,सचिव व खजिनदार यांनी वाचावे क-२ च्या दिनांक १५/९/२०१७ नुसार या कार्यालयास संस्थेच्या पदाधिकारी पदाचा व कार्यकारणीचा राजीनामा सादर करणे बाबत पत्र दिलेले आहे. आणि,

ज्याअर्थी, संस्थेचे अध्यक्ष यांनी वाचावे क-३ च्या दिनांक १३/३/२०१८ नुसार या कार्यालयास संस्थेच्या पदाधिकारी पदाचे राजीनामे देणे बाबत पुन्हा कळविलेले आहे. आणि,

ज्याअर्थी, संस्थेचे संपूर्ण कामकाज ठप्प झाले असल्याचे माझे निदर्शनास आणून, सहकार कायदा, नियम व मंजूर उपविधीतील तरतूदीप्रमाणे कारवाई होणे अपेक्षीत असल्याचे मान्य केले आहे.

त्याअर्थी, संस्थेचे चेअरमन व सचिव यांनी लेखी व तोंडी दिलेली निवेदने पाहता अशी माझी धारणा झाल्याने संस्थेच्या सभासदांच्या हितास्तव मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**-: आ दे श :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७ (अ), (ब-१) अन्वये प्राप्त अधिकारान्वये मी, सुरेश अंधारे, सहायक निबंधक, सहकारी संस्था, डहाणू, ता. डहाणू, जि. पालघर, **सुर्या सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या डहाणू, ता. डहाणू, जि. पालघर** या संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झाल्याने उक्त नमुद संस्थेवर श्री. सरफुदीन ओरा, प्रमाणित लेखापरिक्षक यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. प्राधिकृत अधिका-यांनी कायदयातील तरतूदी नुसार ६ महिन्यांचे कालावधीत संस्थेची निवडणुक घेऊन नवनियुक्त समिमतीकडे पदभार देऊन तसा अहवाल सादर करावा.

१) श्री.सरफुदीन ओरा, प्रमाणित लेखापरिक्षक

हा आदेश माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक ९/८/१८ रोजी दिला असे.

Recd. Banks letter & my letter (Vasin)

स्थळ : डहाणु
दिनांक : ९/०८/२०१८

(सुरेश अंधारे)
सहायक निबंधक
सहकारी संस्था, डहाणू

प्रत,
१) समीती, सुर्या सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या पटेलपाडा, डहाणू (पू) त्याना कळविण्यात येते की, संस्थेचे दफ्तर व माहिती प्राधिकृत अधिकारी यांना देऊन सहकार्य करावे.
२) व्यवस्थापक, जिल्हा मध्य सहकारी बँक शाखा डहाणू रोड डहाणू जि. पालघर.

Scanned by CamScanner